आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१८ एप्रिल २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज संस्थगित

- महिला आरक्षणाच्या संदर्भातलं विधेयक विरोधकांनी राजकीय हेतूनं रोखल्याचा सरकारचा आरोप, तर हे विधेयक नामंजूर होणं हा देशाचा विजय असल्याची विरोधकांची प्रतिक्रिया

- प्रधानमंत्री आज देशाला संबोधित करणार

- जागतिक वारसा दिनानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम

- वाहन परवाना नूतनीकरण प्रक्रियेला येत्या ऑक्टोबर अखेरपर्यंत मुदतवाढ

**आणि**

- भोंदूबाबा अशोक खरातला लैंगिक शोषण आणि आर्थिक फसवणुकीच्या चौथ्या प्रकरणात ३० एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं असून विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशन आज संस्थगित झालं. २८ जानेवारीला या अधिवेशनाला सुरुवात झाली होती.

या अधिवेशनात लोकसभेच्या एकूण ४१ बैठका झाल्या, यात ९३ टक्के कामकाज झालं असं सभापती ओम बिरला यांनी सांगितलं. अधिवेशनात बारा विधेयकं सभागृहात सादर झाली, यातली ९ विधेयकं मंजूर झाली.

राज्यसभेचं कामकाज १५७ तास चाललं. राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून हरिवंश यांची फेरनिवडही या अधिवेशनात झाली.

**<><><><><>**

लोकसभा आणि राज्य विधानसभांमधे महिला आरक्षणाच्या अनुषंगाने मांडलेलं, संविधानाची १३१ वी दुरुस्ती विधेयक लोकसभेत मंजूर होऊ शकलं नाही. यासाठी झालेल्या विशेष अधिवेशनात ५२८ सदस्यांनी मतदान केलं. त्यापैकी  विधेयकाच्या बाजूने २९८ मतं,

तर विरोधात २३० मतं पडली. घटना दुरुस्ती विधेयक संमत होण्यासाठी दोन तृतीयांश मतांची आवश्यकता असते. तेवढी मतं मिळाली नसल्याने हे विधेयक मंजूर झालं नसल्याचं सभापती ओम बिरला यांनी जाहीर केलं.

दरम्यान, या विधेयकाशी संबंधित इतर विधेयकं मागे घेत असल्याचं संसदीय कार्यमंत्री किरेन रीजीजू यांनी जाहीर केलं.

**<><><><><>**

१३१ वी घटनादुरुस्ती विधेयक, लोकसभा मतदार संघ पुनर्रचना विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदा सुधारणा विधेयक ही तीन विधेयकं लोकसभेत गेल्या गुरुवारी मांडण्यात आली होती. महिलांना लोकप्रतिनिधीगृहात ३३ टक्के आरक्षण देणाऱ्या नारी शक्ती वंदन अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी २०२६च्या जनगणनेवर आधारित पुनर्रचना करायची झाल्यास, २०२९च्या लोकसभा निवडणुकीत महिलांना आरक्षण मिळालं नसतं म्हणून हे विधेयक मांडलं होतं. मात्र विरोधकांनी केवळ राजकीय हेतूने ते मंजूर होऊ दिलं नाही, अशी प्रतिक्रिया संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी दिली आहे. केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी याबाबत काँग्रेसवर महिलाविरोधी असल्याची टीका केली.

**.... होल्ड- बाईट- अन्नपूर्णा देवी...**

**<><><><><>**

१३१ व्या घटनादुरुस्तीचं विधेयक हे महिला आरक्षणाच्या नावाखाली लोकसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेसाठी होतं, त्यामुळे हे विधेयक नामंजूर होणं हा विरोधी पक्ष, राज्यघटना आणि देशाचा विजय आहे, असं काँग्रेस महासचिव खासदार प्रियंका गांधी यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत बोलत होत्या.

**- - होल्ड बाईट प्रियांका - -**

या विधेयकाबद्दल विरोधी पक्षांना काहीही माहीत नव्हतं, केवळ एक दिवस आधी विधेयकाचा मसुदा दिला गेला, देशाच्या संघराज्य रचनेला बदलणं आणि लोकशाहीला कमकुवत करण्यासाठीचं हे षड्यंत्र होतं अशी टीका गांधी यांनी केली. हे विधेयक मंजूर झालं असतं तर जातनिहाय जनगणनेची गरज पडली नसती, त्यामुळे सरकारला मनमानी करण्याची

संधी मिळाली असती असा आरोपही त्यांनी केला. २०२३ ला मंजूर झालेलं महिला आरक्षण विधेयक तात्काळ लागू करा अशी मागणीही प्रियांका गांधी यांनी केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज देशाला संबोधित करणार आहेत. रात्री साडेआठ वाजता त्यांचं भाषण होणार आहे.

**<><><><><>**

आज जागतिक वारसा दिन. सांस्कृतिक, नैसर्गिक वारशाची विविधता जपण्यासंदर्भात जागरूकता वाढावी यासाठी हा दिवस आज जगभरात साजरा केला जातो. तसंच ऐतिहासिक स्मारकं आणि स्थळांच्या संवर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी देखील हा दिवस 'आंतरराष्ट्रीय स्मारकं आणि स्थळं दिन' म्हणूनही साजरा केला जातो. 'संघर्ष आणि आपत्तीच्या काळात ऐतिहासिक वास्तूंच्या संरक्षणासाठी आपत्कालीन प्रतिसाद' अशी या दिनाची यंदा संकल्पना आहे. ऐकूया याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून

**.... व्हॉईस कास्ट-**

*(देशाचं सांस्कृतिक रूप अनेक पुरातन स्मारकं, वस्तू आणि ऐतिहासिक स्थळांनी नटलेलं आहे. या वास्तू आणि वस्तू केवळ भूतकाळाचे अवशेष नाहीत तर तो एक सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा आहे. गेल्या दशकभरात देशाच्या सांस्कृतिक संपत्तीचं रक्षण करण्यावर नव्यानं भर दिला गेला आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागातर्फे ३ हजार ६८६ संरक्षित स्मारकांचं जतन केलं जातं. मोठ्या प्रमाणात डिजिटायझेशन, राष्ट्रीय वारसा डेटाबेसची निर्मिती, दस्तऐवजीकरण आणि संवर्धनासाठी वैज्ञानिक आणि डिजिटल साधनांचा व्यापक अवलंब करत असल्यानं वारसा आणि स्मारकांच्या जतनकार्यात वेगानं प्रगती होत आहे. युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केलेली ४४ स्थळं देशात आहेत. मराठा इतिहासातल्या १२ किल्ल्यांचा यात समावेश झाला आहे. सरकारनं व्यापक सांस्कृतिक आणि वारसा परिसंस्थेमध्ये विशेषतः डिजिटायझेशन, दस्तऐवजीकरण आणि सांस्कृतिक मालमत्तेची सुरक्षितता यांसारख्या क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करायला सुरुवात केली आहे. हस्तलिखितं, दस्तावेज संरक्षित करण्यासाठी एआयचा मोठ्या प्रमाणात वापर सुरु केला आहे.*

*लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी जागतिक वारसा दिनाबद्दल देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.*

*केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी नागरिकांना या दिनाच्या शुभेच्छा देताना ऐतिहासिक स्थळं, मंदिरं तसंच प्राचीन किल्ल्यावरच्या भिंती, परिसर स्वच्छ ठेवण्याचं आणि त्यांचं जतन करण्याचं आवाहन केलं आहे.*

*जागतिक वारसा दिनानिमित्त, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेला ट्विटर वर शुभेच्छा दिल्या आहेत. आपला गौरवशाली इतिहास, संस्कृती, कलेचा अमूल्य वारसा जपूया आणि विकसित महाराष्ट्र घडवूया, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी आवाहन केलं आहे. आपल्या इतिहासाची, संस्कृतीची आणि परंपरेची जपणूक करणाऱ्या या ऐतिहासिक वास्तूंचं संवर्धन करणं ही प्रत्येकाची जबाबदारी असून आपल्या वारसा स्थळांचं रक्षण आणि जतन करूया, असं आवाहन करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.*
*जागतिक वारसा निमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रम होत आहेत. ठाणे जिल्हा प्रशासनानं शहरात एका 'हेरिटेज वॉक' चं आयोजन केलं होतं. प्रसिद्ध कौपिनेश्वर मंदिरापासून या वॉकची सुरुवात झाली. त्यानंतर मासुंदा तलाव, ऐतिहासिक सेंट जॉन द बॅपटिस्ट चर्च, पारसी सिनेगॉग, एक जैन मंदिर, मुस्लिम धर्मादाय सामाजिक भवन या ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन टाऊन हॉल इथं हेरिटेज वॉकची सांगता झाली. )*

**<><><><><>**

एटीएस अर्थात ऑटोमॅटिक टेस्टिंग स्टेशन प्रणाली बंद असल्यामुळे रखडलेल्या वाहन परवाना नूतनीकरण प्रक्रियेला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावर्षी ऑक्टोबर अखेरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यामुळे राज्यातल्या टेम्पो, स्कूलबस, रिक्षा यांचा परवाना नूतनीकरण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एटीएस प्रणाली अद्ययावत करण्यासाठी ती बंद करण्यात आली होती. त्यामुळे परवाना नूतनीकरणाची प्रक्रियाही ठप्प झाली होती. त्यामुळे १५ लाख वाहतूक व्यावसायिकांना अडचणी येत होत्या. मुदतवाढीमुळे त्यांना दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात पत्र लिहून विनंती केली होती.

**<><><><><>**

भोंदूबाबा अशोक खऱातला लैंगिक शोषण आणि आर्थिक फसवणुकीच्या चौथ्या प्रकरणात नाशिकमधल्या न्यायालयाने ३० एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी दिली आहे. या प्रकरणात पीडिता आपली कौटुंबिक समस्या सोडवण्यासाठी खरातकडे आली होती.

विशेष तपास पथक खरातला उद्या पुन्हा एकदा न्यायालयासमोर हजर करेल आणि लैंगिक शोषणाच्या पाचव्या प्रकरणात पोलीस कोठडीची मागणी करेल.

//<><><><><>//